## फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २०० अनुसार

**फिर्यादी** – रेखा उमाकांत कांबळे,
वय :– ४८ वर्षे, व्यवसाय :– घरकाम,
राहणार :– गणेश नगर, औसा, ता. औसा, जि. लातूर.

**मी शपथपुर्वक निवेदन करते की** :

**०१.** आरोपी माझे शेजारी आहेत. आरोपींनी फेब्रुवारी–२०१७ मध्ये सदरचा महाकाली महिला बचत गट सुरु केला होता. त्यानुसार मी व इतर अनेक महिला आरोपींच्या घरी गेलो होतो. आम्ही दिनांक १०/०२/२०१७ रोजी आरोपीच्या घरी गेलो. आरोपींनी सदर बचत गटामध्ये प्रत्येक महिन्याला ५००/– रुपये भरावयाचे गरज असताना सदरची रक्कम एकत्रीतपणे गरजु महिलेला द्यायची. त्यासाठी प्रतिमहिना २% व्याजदर आकारण्यात येईल. त्यानुसार मी व इतर महिला असे सभासद झाले. माझ्या सोबत माझ्या घरातील आठ सदस्य झाले होते. त्यानुसार आम्ही साधारण पाच ते सहा महिने नियमीतपणे पैसे भरले.

**०२.** मला साधारण ऑगस्ट–२०२५ मध्ये पैशांची गरज पडली. त्यामुळे मी गोजरबाई हिला पन्नास हजार रुपये गरजेपोटी देण्याची मागणी केली. त्यावर गोजरबाई हिने मला नकार दिला. तिने पैसे नसल्याचे सांगितले. तिने मला बँकेचे चेक संपले आहेत असे सांगितले. त्यानंतर तिने दोन दिवसांनंतर मला येण्यास सांगितले. त्यावर तिने मला दोन कोरे चेक देण्यास सांगितले व मला पन्नास हजार रुपये तिने दिले. सदरचे चेक माझ्या औसा येथील आय.सी.आय.सी.आय. बँकेचे होते. त्यापैकी एका चेकचा नंबर ५४३ व दुस–या चेकचा नंबर ५४७ असा होता.

**०३.** सप्टेंबर महिन्यापासुन मी परतफेड करणे सुरु केले. मी एकत्रीतपणे चाळीस हजार रुपयांची परतफेड केली आहे. सदर परतफेड केल्याच्या नोंदी

महाकाली महिला बचतगटाच्या पासबुकात आरोपींनी केल्या आहेत. आम्ही विश्वासाने आमचे पासबुक व इतर कागदपत्रे आरोपींकडे ठेवत असे. त्यामुळे आम्ही सदर पासबुक पाहील्यास आम्हाला आरोपीने त्यामध्ये खाडाखोड केल्याचे दिसुन आले. एकदा पाहील्यावर असे दिसले की, रुपये २९,०००/- उचल घेतली असताना त्यामध्ये खाडाखोड करुन ती रुपये ७२,०००/- करुन नोंद घेतली होती. तसेच एकदा रुपये ८,०००/- घेतले असताना त्यामध्ये एक शुन्य वाढवुन रुपये ८०,०००/- ही रक्कम टाकली. तसेच एकदा रुपये ५,०००/- घेतले असताना रुपये २९,०००/- ही रक्कम पासबुकात परस्पर बेकायदेशीररित्या अविश्वासाने नोंद केली आहे.

**०४.** सदर आरोपी ही पासबुक ठेवल्यानंतर खाडाखोड करत असे. डिसेंबर-२०२१ मध्ये मी औसा येथे नसताना अथवा पैसे घेतले नसतानाही आरोपीने वाईट उद्देशाने सदर पासबुकात खोट्या नोंदी केल्या आहेत.

**०५.** सदर बचतगटात रेखा उमाकांत कांबळे, विजयालक्ष्मी उमाकांत कांबळे, वैष्णवी उमाकांत कांबळे, अंबिका विनोद कांबळे व माझ्या बहिणी आरती सुनिल कांबळे आणि श्रीदेवी जितेंद्र डोंगरे व इतर दोन लोकांचे खाते होते. आलफिया सादिक शेख व आयेशा सादिक शेख अश्या पासबुकांमध्ये खाडाखोड केली. त्यावर आम्ही आरोपीला विचारले असता, आमच्यासोबत विनाकारण तिने भांडणे केली.

**०६.** त्यावर आरोपीने तिची चुक झाल्याचे मान्य केले. आरोपीने आम्हाला याचे परिणाम भोगावे लागतील अशी धमकी दिली. तसेच मी आरोपीने चुकीच्या पध्दतीने नमुद केलेल्या रक्कमांची देखील परतफेड केली आहे. त्यानंतर पुन्हा मी सदर गटात पुर्वीचे पैसे असल्यामुळे तसेच माझे चेक आरोपीकडे असल्यामुळे पुन्हा गटामध्ये पैसे भरणे सुरु केले. त्यावर मला एकदा गरज असताना मी २५,०००/- रुपये मागितले होते.

**०७.** दिनांक १५ नोव्हेंबर २०२२ मध्ये मी आरोपीला एक लाख रुपयांची मागणी केली. त्यावर आरोपीने मला पैसे देण्यास नकार दिला. त्यानंतर देखील तिने मला चेकची मागणी केली. त्यावर तिने माझा सोडुन इतर व्यक्तीचा चेक देण्याची मागणी केली. त्यावर मी विशाल उमाकांत कांबळे या माझ्या मुलाचा चेक आरोपीकडे दिला. सदर एक लाख रुपयांची मी पाच हजार रुपये प्रमाणे हफ्ता करुन परतफेड केली.

**०८.** आरोपीच्या अशा पध्दतीमुळे आम्ही सर्व महिलांनी एकत्रीत येवुन आरोपीसोबत बैठक घेतली. प्रत्येकाने आपला हिशोब मांडला. त्यावेळेस आरोपीने माझे पैसे देण्यास नकार दिला. त्यावर मी विचारणा केली असता ती म्हणाली की, ‘तु माझा भांडाफोड केला आहेस, तुला हिशेब व पैसे देत नाही.’ मी चेक परत करण्याची मागणी केली परंतु त्यास आरोपीने नकार दिला. आरोपीने मला माझे पैसे देखील परत दिले नाहीत. माझे साधारण सात लाख रुपये आरोपीकडे जमा आहेत. त्यानंतर आम्ही आरोपीविरुध्द पोलीस तक्रार दिली. परंतु पोलीसांनी आमची दखल घेतली नाही. त्यानंतर आम्ही पोलीस अधिक्षक, लातूर यांच्याकडे तक्रार दाखल केली. परंतु त्यांनी देखील दखल घेतली नाही. आरोपीवर योग्य कारवाई शिक्षा व्हावी ही विनंती.

समक्ष

साक्षीदाराची सही/अंगठा व तारीख.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by PARAG PHADNIS AWATE
Date: 2025.12.05 16:57:14 +0530

(श्री. आवटे पी. पी.)

दिनांक ०५/१२/२०२५. प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी, औसा.